क्रमांक : १५९

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२/ अग्रहायण २९, १९४४ (शके)**

१५९. महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) अन्वये शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना :-

**(अ) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी सभागृहात दिलेल्या निदेशानुसार दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले तथापि, चर्चा न झालेल्या अशासकीय ठरावाच्या सूचना (क्रमांक १ ते ३) :-**

**(१) श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांचा ठराव क्र. १३३**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्य लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १७**

"राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि इतर महानगरपालिकामधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठया वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, या बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५९**

"राज्यात राष्ट्रीय व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्रे सुरु झाल्यास तेथे वैदयकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी यांची नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे, राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होणे, तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार मिळणे, यासाठी राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येक ५० कि.मी. अंतरावर एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(ब) मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी बॅलटमध्ये आलेल्या अशासकीय ठरावाच्या सूचना (क्रमांक १ ते ५) :-**

**(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६९**

"राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या विशेषत: यवतमाळ जिल्हयातील बेंबळा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

.. २/-

(२) **श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २३१**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबाना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री. संजयमामा शिंदे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २१९**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारा अभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) **श्री. संग्राम थोपटे, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६७**

"राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठया प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रिडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २०६**

"राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणावर स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्राची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगाराची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमीपूत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपूत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
**नागपूर,**
**दिनांक : २० डिसेंबर, २०२२**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (website)